महाराष्ट्र शासन

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती

प्लॉट पी -१०७ एम.आय.डी.सी.आवार, महिला रुग्णालयासमोर, बारामती पिन नं. ४१३१३३

Email-admgmcbaramati@gmail.com Ph : ०२११२-२४४१७२

जा.क्र.पुअहोशावैमबा/राजप/ ४९२५ /२०२३ दिनांक: २२/११/२०२३

प्रति,
मा. आयुक्त (वैद्यकीय शिक्षण)
संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन,
मुंबई.

विषय :- वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व संलग्नित रुग्णालयात चिकित्सालयीन तसेच अतिविशेषोपचार विभागातील विविध विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या संवर्गातील रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत.

संदर्भ :- मा.संचालनालयाचे पत्र क्र. संवैशिवसंमु/जाहिरात/करार/क१/२५९३२०२३ दि.२५/०२/२०२३

महोदय,

उपरोक्त विषयांकित प्रकरणी सविनय सादर करण्यात येते की, संदर्भिय मा. संचालनायाच्या पत्रान्वये प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापकांची रिक्त पदे मध्यवर्ती निवड प्रक्रियेमार्फत करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याबाबत संस्थास्तरावरुन जाहिरात प्रसिध्द करण्याबाबत कळविण्यात आले होते. त्यानुसार या महाविद्यालयातील रिक्त पदे भरण्याबाबत मा. उपसंचालक (माहिती) विभागिय माहिती कार्यालय, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना जाहिरातीची सुचना देण्यात आली आहे. सदर सुचनेमध्ये प्रसिध्द करण्याचा अंतीम दिनांक १८/११/२०२३ आहे.

यास्तव आपणांस विनंती आहे की, सदर संदर्भिय पत्रात नमुद केल्याप्रमाणे या महाविद्यालयाची जाहिरात WWW.MED.EDU.IN या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी. सोबत जाहिरातीची प्रत जोडण्यात आली आहे.

आपल्या माहिती व पुढील कार्यवाहिस्त्व सविनय सादर.

आपला विश्वासू

(डॉ. चंद्रकांत म्हस्के)
अधिष्ठाता
पु.अ.होळकर.शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,बारामती

D:\राजप 2021 D.J\जाहिरात\2023\जाहिरात.docx

महाराष्ट्र शासन

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती


प्लॉट पी -107 एम.आय.डी.सी.आवार, महिला रुग्णालयासमोर, बारामती पिन नं. 413133

Email-admgmcbaramati@gmail.com Ph : 02112-244172


जा.क्र.पुअहोशावैमबा/राजप/५००७/२०२३ दिनांक ०७/०९/२०२३

## जाहिरात

संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांच्या अधिपत्याखालील पु.अ. होळकर, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, बारामती वैद्यकीय अध्यापन व रुग्णसेवा याकरीता चिकित्सालयीन विषयातील प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक या सवंर्गातील रिक्त असलेली पदे संस्थास्तरावरुन करार तत्वावर ३६४ दिवसांकरीता निव्वळ व तात्पुरत्या नियुक्तीने भरण्याकरीता इच्छूक पात्र उमेदवारांकडुन ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

इच्छुक पात्र उमेदवारांकडून मागविण्यात येत असलेले अर्ज संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई, यांच्या www.med.edu.in या संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून ते ०७/१२/२०२३ सायंकाळी ०५ वाजेपर्यंत (शासकीय सुट्टी वगळून) अर्ज ऑनलाईन पध्दतिने स्विकारले जातील. उमेदवाराने शैक्षणिक अर्हता, अनुभव प्रमाणपत्र व इतर आवश्यक कागदपत्रे अर्जासोबत ऑनलाईन UPLOAD करणे अनिवार्य राहील. अर्ज करण्यासाठी लिंक www.med.edu.in वर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. करार तत्वावर तात्पुरत्या नियुक्तीबाबतची माहिती संचालनालयाच्या संकेत स्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येईल.

**संवर्ग - प्राध्यापक**

| अ.क्र | विषयाचे नाव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव/अर्हता/पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | बालरोगचिकित्साशास्त्र | १ | M.D.(Paediatrics)DNB (Paediatrics) | As per notification 14/02/2023<br>1) Associate Professor in the subject for 3 years in a permitted /Approved/recognized medical college/institution Should have atleast four Research Publications (atleast two as Associate Professor) (only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Medline, Pubmed Central, Citation index, Sciences Citation Index, Expanded Embase, Scopus, Directory fo Open Acess journals (DoAJ) will be considered).<br>The author must be amongst first three or should the corresponding author.<br>III) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC. |
| २ | क्षयरोगशास्त्र | १ | M.D. Pulmonary Medicine | |
| ३ | शल्यचिकित्साशास्त्र | १ | M.S.(Surgery)DNB (Surgery) | |
| ४ | मनोविकृतीशास्त्र | १ | MD.Psychiatry/ MD (Psychological Medicine)/ MD Medicine with Diploma inpsychological Medicine)/ DNB (Psychiatry) | |
| ५ | औषधवैद्यकशास्त्र | १ | M.D.(General Medicine) /DNB (General Medicine) | |
| ६ | कान-नाक व घसाशास्त्र | १ | M.S.(Oto-Rhino-Laryngology) DNB (Oto-Rhino-Laryngology) | |
| ७ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ | M.S. (Orthopedics)/DNB (Orthopedics) | |

संवर्ग – सहयोगी प्राध्यापक

| अ.क. | विषयाचे नांव | पद संख्या | शैक्षणिक अर्हता | अनुभव |
|---|---|---|---|---|
| १ | बधिरीकरणशास्त्र | १ | M.D. (Anesthesiology)/ DNB (anesthesiology) | As per notification 14/02/2022<br>I) Assistant Professor in the subject for 4 years in a permitted/Approved/recognize medical college/institution<br>II) Should have atleast two Research Publications (only original papers, meta-analysis, systematic reviews and case series that are published in journals indexed in Mediline, Pubmed Central, Citation index, Expanded Embase, Scopus, Directory of Open Excess journals (DoAJ) will be considered).<br>The author must be amongst first three or should be the corresponding author.<br>III) Should have completed the basic course in biomedical research from institution (s) designated by NMC. |
| २ | क्ष किरणशास्त्र | १ | M.D. (Radio-diagnisis/ M.D.(Radiology)/ DNB (Radiology) | |
| ३ | स्त्रीरोग व प्रसुतीशास्त्र | १ | M.S. (Obstetrics and Gynecology) / DNB (Obserics and Gynecology) | |
| ४ | बालरोगचिकित्साशास्त्र | १ | MD (Paediatrics)/ DNB (paediatrics) | |
| ५ | शल्यचिकित्साशास्त्र | १ | M.S. (General Surgery) DNB (General Surgery) | |
| ६ | मनोविकृतीशास्त्र | १ | M.D. (Psychiatry)/ MD (Psychological Medicine/ M.D. Medicine with Diploma in Psychological Medicine with Diploma in Psychological Medicine/ DNB (Psychiatry) | |
| ७ | औषधवैद्यकशास्त्र | २ | M.D. (General Medicine)/ DNB (General Medicine) | |
| ८ | अस्थिव्यंगोपचारशास्त्र | १ | MS (Orthopedics)/ DNB (Orthopedics) | |
| ९ | त्वचा व गुप्तरोग | १ | MD (Dermatology and venereology)/ MD Dermatology, venereology and leprosy)/ MD Dermatology including venereology)/ MD Dermatology including venereology/ leprosy)/ MD (medicine with D.V.D or D.D./DNB (dermatology and venereology and venereology | |

टिप : सदर जाहिरातीमधील नमुद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णपणे रद्द करण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी स्वताकडे राखून ठेवला आहे.

महत्वाची टिप:

१) उमेदवार हा भारताचा नागरिक व महाराष्ट्रातील रहिवासी असावा.

२) उमेदवाराचे वय:नियुक्ती वेळेस दि. ३०/११/२०२३ रोजी कमाल ६९ वर्षापेक्षा जास्त नसावे.

३) प्राध्यापक व सहयोगी प्राध्यापक यांना करार पध्दतीने नियुक्तीसाठी त्या-त्या पदावरुन सेवानिवृत्त झालेल्या अध्यापकांबरोबरच कोणत्याही वयोगटाचे राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाने विहीत केलेली आवश्यक अर्हता धारण करणारे खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) पात्र असतील.

४) मानधन:

अ) सेवानिवृत्त अध्यापकांची करार पध्दतीने नियुक्ती झाल्यास त्यांना शासन निर्णय दिनांक १७.१२.२०१६ मधील तरतुदीनुसार दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

ब) खाजगी वा अन्य क्षेत्रातील उमेदवार (बिगर सेवानिवृत्त) यांना खालील नमुदप्रमाणे दरमहा मानधन अनुज्ञेय असेल.

| अ.क्र. | पद | विषय | दरमहा मानधन |
|---|---|---|---|
| १ | प्राध्यापक | चिकित्सालयीन - बारामती | रु.२,००,०००/- |
| २ | सहयोगी प्राध्यापक | चिकित्सालयीन - बारामती | रु.१,८५,०००/- |

५) गुणांकन पध्दत: जाहिरातीसोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ मध्ये नमुद केरण्यात आलेली आहे.

(१) परिशिष्ट-अ मध्ये नमूद नुसार अ.क्र. १ ते ४ वरील एकूण ८५ गुणांच्या आधारे तात्पुरती गुणवत्ता यादी तयार करुन त्यानुसार उमेदवारांना प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखतीस पात्र ठरविण्यात येईल.

(२) प्रत्यक्ष कागदपत्र पडताळणी व मुलाखती अंती १०० गुणांपैकी किमान ४१% किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या उमेदवारांचाच करार तत्वावरील नियुक्तीकरीता विचार केला जाईल.

नियम व अटी :

१) करार पध्दतीने नियुक्तीचा कालावधी हा नियमित उमेदवार उपलब्ध होईपर्यंत अथवा ३६४ दिवसांचा कालावधी यापैकी जे अगोदर घडेल इतका राहील. तथापी सदरहु पदावर नियमित उमेदवार उपलब्ध् झाल्यास कंत्राटी उमेदवाराच्या पदस्थापनेत बदल करुन देण्याचे अधिकार आयुक्त यांना राहतील.

२) उमेदवाराच कामकाज समाधानकारक नसल्यास, गंभीर स्वरुपाची अनियमितता व गैरवर्तणूक या कारणासाठी त्याची नियुक्ती कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय संपुष्टात येईल.

३) करार पध्दतीने नियुक्त उमेदवाराने प्रस्थापित मानकांनुसार अध्यापन, रुग्णसेवा व अधिष्ठाता यांनी नुमुन दिलेली विवक्षित कामे पार पाडणे आवश्यक राहील.

४) वरीलप्रमाणे विहीत कामकाज पार पाडल्यानंतर महाविद्यालयीन व रुग्णालयीन कर्तव्य व जबाबदाऱ्यांवर विपरीत परिणाम होणार नाही याची दक्षता घेऊन उमेदवारास खाजगी वैद्यकीय व्यवसाय करण्याची मुभा राहील.

५) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारांना नियमित नियुक्तीसाठी कोणताही हक्क राहणार नाही, तसेच सदर कालावधीत कोंणत्याही सेवा प्रयोजनासाठी ग्राह्य धरला जाणार नाही.

६) करार पध्दतीने नियुक्त उमेदवारास त्याच्या सेवा कालावधीत केवळ नैमित्तीक रजा अनुज्ञेय असतील.

७) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्तींनी त्यांना प्राप्त होणाऱ्या कागदपत्रे/माहिती आधारसामुग्रीबाबत गोपनियता पाळणे आवश्यक राहील.

८) करार पध्दतीने नियुक्त करण्यात आलेल्या व्क्तींना कोणत्याही प्रकाराचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार प्रदान करता येणार नाहीत.

९) उमेदवारास नियुक्ती देण्यात आल्यानंतर कितान एक शैक्षधिक सत्र संपेपर्यंत त्यास कोणत्याही परिस्थितीत सेवा सोडता येणार नाही. तशा आश्याचे शपथपत्र उमेदवारास नियुक्तीपूर्वी सादर करणेबंधनकारक असेल. असे शपथपत्र सादर करणाऱ्या उमेदवारासच करार पध्दतीने नियुक्ती देण्यात येईल. शैक्षणीक सत्र चालू असलेल्या कालावधीत विद्यार्थीहीत विचारात घेता उमेदवाराचा राजीनामा कोणत्याही परिस्थितीत स्वीकरला जाणार नाही.

१०) विगर सेवानिवृत्त गटातून करार पध्दतीने नियुक्त होणाऱ्या अध्यापकाची नंतरच्या काळात नियमित नियुक्ती झाल्यास त्याला पूर्वीच्या सेवेचे कोणतेही लाभ उनुज्ञेय असणार नाहीत.

११) अर्जदाराने संबंधित पदासाठी शारीरीकदृष्टया पात्र असल्याने वैद्यकीय प्रमाणपत्रे सादर करावे.

१२) सदर जाहिराती मधील नमूद पदसंख्येत बदल करणे/सदरची जाहिरात पुर्णत: रद्द करण्याचा अधिकार अधिष्ठाता स्वता:कडे राखून ठेवला आहे.

१३) नमूद रिक्त पदांच्या संख्येत बदल करणेबाबतचे सर्व अधिकार अधिष्ठाता राहतील.

१४) अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष्रित्या कोणताही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१४) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र निवडीसाठी समितीवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्षरित्या कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून बाद करण्यात येईल.

१५) अर्जदाराचे नांव महाराष्ट्र वैद्यकीय मंडळ अधिनियम १९६५ च्या अंतर्गत कायम नोंदणी केल्याबाबतचे प्रमाणपत्र किंवा भारतीय वैद्यकीय परिषदेचे कायम नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

१६) उमेदवारांना मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल. (मुलाखतीचे वेळापत्रक वेगळ्याने कळविण्यात येईल.)

१७) मुलाखतीला येताना उमेदवारांनी Online सादर केलेल्या सर्व दस्तऐवजांचे मुळ कागदपत्रे सोबत आणणे बंधनकारक राहील.

अधिष्ठाता

पु.अ.होळकर,शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,

बारामती

D:\राजप 2021 D.J\जाहिरात\2023\जाहिरात.docx